रे. दि.मु.१६०/२०२० मधील नि.९९ खालील आदेश
(जुना नं. रे. दि.मु. ८२/२००७)
(CNR-**MHSN15004377-2020**)
(आनंदा पवार वि. इंदिरा पवार वगैरे ५ )

वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ७ सुशिला मधुकर जाधव यांचे पुढे "मयत वारस" अशा दुरुस्तीस परवानगी देण्यात येऊन वारस अभिलेखावर घेण्यासाठी विनंती केलेली आहे.

(२) वादीचे असे कथन आहे की, वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीविरुध्द साठेखतावरुन खरेदीपत्र होवून मिळणेकरिता दाखल केलेला आहे. दाव्याचे काम चालू असताना दाव्यातील प्रतिवादी क्र. ७ सुशिला मधुकर जाधव ही उचगांव, कोल्हापूर येथे दि. २५/०४/२०१९ रोजी मयत झालेली आहे. सदरची दुरुस्ती ही फॉर्मल स्वरुपाची असुन त्यामुळे मुळ दाव्यात अगर दाव्याचे वर्णनात कोणताही बदल होत नाही असे कथन केले आहे. तसेच दाव्याचे कामी प्रतिवादी नं. ७ हिचे वारस सदरचा दावा हा साठेखतावरुन खरेदीपत्र होवून मिळणेबाबत असल्याने असे वारस हे खरेदीपत्र करुन घेतेवेळी व दाव्याचे कामी जरुरीचे पक्षकार आहेत. तसेच सदरील वादी हा ऐनवाडी येथे राहत असून प्रतिवादी ही उचगांव, कोल्हापूर येथे मयत झालेली आहे. प्रतिवादी क्र.७ यांच्या मृत्यूबद्दलची माहिती वादी यांना मिळू शकली नाही. तसेच सदर दाव्याचे कामी प्रतिवादींनीही प्रतिवादी क्र. ७ ही मयत झालेबाबतची पुरसीस दिलेली नाही. वादीस अपुऱ्या ज्ञानामुळे माहिती नसलेने असे मुदतीत वारस रेकॉर्डवर आणता आलेले नाहीत व त्यास विलंब झाला असलेने विलंब माफीबाबतचा अर्ज दाखल केलेला आहे. तसेच वादीने सदरील मयत वारस दुरुस्तीस परवानगी मिळून वारस दुरुस्ती होवून मिळणेबाबत विनंती केली आहे.

रे.दि.मु. १६०/२०२०
(जुना नं. रे. दि.मु. ८२/२००७)
नि.९९ खालील आदेश

(३) प्रतिवादीतर्फे त्याच अर्जावर म्हणणे सादर करुन वादीच्या अर्जातील सर्व कथने मान्य व कबुल नाहीत असे कथन केले आहे. वादीने जाणिपुर्वक वारस रेकॉर्डवर आणणेत विलंब केला असून अर्ज नामंजूर करणेची विनंती केली आहे.

(४) नि. ९९ कडील अर्ज व त्यावरील म्हणणे यांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादीतर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. दाव्याचे कामी प्रतिवादी नं. ७ हिचे वारस सदरचा दावा हा साठेखतावरुन खरेदीपत्र होवून मिळणेबाबत असल्याने असे वारस हे खरेदीपत्र करुन घेतेवेळी व दाव्याचे कामी जरुरीचे पक्षकार आहेत. सदरचा अर्ज विचारात घेता न्याय हिताच्या दृष्टीने प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरते. सबब, अनेक वाद-विषय टाळण्याकरीता आणि दावा गुणदोषावर निकाली करण्यासाठी प्रतिवादी क्र. ७ चे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. वरील सर्व कारणांचा विचार करुन खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

**०१.** अर्ज र. रु. २००/- (र. रु. दोनशे मात्र) खर्चासह मंजूर करण्यात येतो.

**०२.** वादीने दावादुरुस्ती प्रत पुढील तारखेपर्यंत दाखल करण्याची आहे.

Digitally signed by Gaurav Sadashiv Hange
Date: 2021.02.04 17:52:57 +0530

( जी. एस. हांगे )
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, विटा.
जि. सांगली.

विटा.
दिनांकः-०१.०२.२०२१

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Smt. S.P.Patil. |
| Name of the Court | : | Shri. G. S. Hange,<br>2nd Jt. Civil Judge J.D. & J.M.F.C.,<br>Vita. |
| Date of Decision | : | 01/02/2021 |
| Order signed by the presiding officer on | : | 04/02/2021 |
| **Order uploaded on** | **:** | **04/02/2021.** |